# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:15.03.2026** **वारः रविवार**

---

**<u>ठळक बातम्या</u>**

**<u>-कोळसा वायूकरण आणि आणि कार्बन संकलन प्रक्रियेच्या प्रकल्पाचं तसंच भारतातील सर्वात मोठ्या 10 गिगावॅट एकात्मिक इनगॉट आणि वेफर उत्पादन प्रकल्पाचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन</u>**

**<u>- देशात एलपीजी गॅस आणि इंधनांचा पुरेसा साठा, सिलिंडरची नोंदणी ऑनलाईन पद्धतीनं करावी, वितरकांच्या दुकानांबाहेर रांगा लावू नयेत, सरकारचं आवाहन.</u>**

**<u>- अकोला जिल्हा पोलीस दलाच्या त्रिनेत्र प्रकल्पाची प्रतिष्ठित स्कॉच पुरस्कारासाठी निवड आणि</u>**

**<u>- दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांसह वादळ आणि हलक्या पावसाची शक्यता</u>**

**<u>आता सविस्तर बातम्या</u>**

**<u>कोळसा गॅसिफिकेशन</u>**

चंद्रपूर इथल्या न्यू एरा क्लीनटेक कंपनीकडून उभारण्यात येणाऱ्या ग्रीनफिल्ड कोळसा गॅसिफिकेशन अर्थात कोळसावायूकरण आणि आणि कार्बन संकलन प्रक्रियेच्या प्रकल्पाचं काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आलं. या प्रकल्पाचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होणार नाही असं तंत्रज्ञान केंद्र सरकारने आणलं असून हा अत्यंत आनंदाचा क्षण असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. केंद्रीय कोळसा आणि खाणमंत्री किशन रेड्डी हेही यावेळी उपस्थित होते.

विदर्भात विपुल प्रमाणात खनिज संपदा आहे या संपत्तीचा उपयोग करताना मोठ्या प्रमाणात प्रदूषण झालं तर त्याचा हवामान बदलावर विपरीत परिणाम होतो हे टाळण्यासाठी कोलगॅसिफिकेशन अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरणारे सात प्रकल्प भारतात सुरू केले जाणार असून त्यातले चार प्रकल्प विदर्भात असणार आहेत. यातून आवश्यक ती रसायनं आणि कार्बन संकलन केलं जाईल युरिया ही तयार होईल मात्र या पर्यावरण पूरक हरित पोलाद प्रकल्पाच्या माध्यमातून कुठलंही प्रदूषण होणार नाही ही बाब भारतासाठी वरदान ठरणार आहे असं मुख्यमंत्री म्हणाले. पहिला टप्पा दोन वर्षात पूर्ण होईल यामध्ये 30 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणि 10 हजार लोकांना रोजगार मिळेल असा विश्वास व्यक्त करताना फडणवीस म्हणाले. . . . . . ..

**बाईट-देवेंद्र फडणवीस**

चंद्रपूर जिल्ह्यात देशातला हा पहिला प्रकल्प सुरू होणार आहे. इथल्या दोन्ही प्रकल्पात सुमारे 1700 कोटी रुपयांची गुंतवणूक होईल असं केंद्रीय मंत्री जी किशन रेड्डी यावेळी म्हणाले.

**सौर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल नागपूरजवळ बुटीबोरी इथं दहा गिगावॅट एकात्मिक सोलर इनकोट आणि वेफर निर्मितीच्या प्रकल्पासह भूमिपूजन झालं. सौर ऊर्जा पॅनल तयार करण्यासाठी इनकोट अर्थात सौर तबकडी तयार करण्यासाठी लागणारे सिलिकॉनचे मोठे तुकडे आणि वेफर्स अर्थात सिलिकॉनचे पातळ काप लागतात त्यांची निर्मिती या प्रकल्पात केली जाणार आहे. हरित ऊर्जेच्या दृष्टीनं हा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असल्याचं सांगताना देशाचं हरित ऊर्जेचे उद्दिष्ट साध्य करण्यात हा प्रकल्प महत्त्वाचा ठरेल असं फडणवीस यावेळी म्हणाले.

**जहाज**

भारतीय ध्वजधारक असलेल्या 'शिवालिक' आणि 'नंदा देवी' या दोन जहाजांनी 'हॉर्मुझची सामुद्रधुनी' सुरक्षितपणे पार केली आहे. बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी काल नवी दिल्ली इथं आयोजित आंतर-मंत्रालयीन प्रसारमाध्यम परिषदेला संबोधित करताना ही माहिती दिली. या जहाजांमधून 92 हजार 700 मेट्रिक टन एलपीजी वाहून नेला जात असल्याचं त्यांनी नमूद केलं. ही जहाजे दोन दिवसांत मुंद्रा आणि कांडला बंदरांवर पोहोचतील, अशी माहितीही सिन्हा यांनी यावेळी दिली.

कोणत्याही किरकोळ विक्री केंद्रावर किंवा एलपीजी वितरक केंद्रावर इंधनाचा साठा असून डिझेल आणि पेट्रोलचाही पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी यावेळी  दिली. ग्राहकांनी गरज असेल तरच सिलिंडर मागवावा. सिलिंडरची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने करावी, वितरकांच्या दुकानांबाहेर रांगा लावू नयेत असंही आवाहन शर्मा यांनी केलं आहे.

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सहसचिव सी. सेंथिल राजन यांनी, समाजमाध्यमांवर पसरवल्या जाणाऱ्या खोट्या बातम्यांपासून सावध राहण्याचे आवाहन नागरिकांना केलं आहे.

हे प्रादेशिक बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून देण्यात येत आहे...

**गॅससिलिंडर**

युद्धामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा गैरफायदा घेऊन ठीकठिकाणी प्रशासनाने गॅस सिलिंडरची साठेबाजी आणि काळाबाजार करणाऱ्यांविरुद्ध कडक पावले उचलली आहेत.
पुण्यात प्रशासनाने  मारलेल्या एका छाप्यात ५४ भरलेले आणि २०७ रिकामे सिलिंडर जप्त करण्यात आले.
बीड शहरात ७३ हजार ५५० रुपयांचा सिलेंडर साठा जप्त करण्यात आला.भंडारा इथं 8 सिलेंडर जप्त करत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
दरम्यान एलपीजीच्या वितरणात कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार किंवा जाणीवपूर्वक करण्यात आलेली दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही. तसा प्रयत्न केल्यास थेट गुन्हे दाखल करण्याचा इशारा रत्नागिरीचे पालकमंत्री उदय

सामंत यांनी दिला आहे. शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार रुग्णालयं, शैक्षणिक संस्था, सार्वजनिक सेवा, स्मशानभूमी, वृद्धाश्रम, अनाथाश्रम यांना 100 टक्के उपाहारगृहं, संरक्षण क्षेत्र, शासकीय आणि सार्वजनिक क्षेत्र, रेल्वे, हवाई वाहतूक, पोलीस-तुरुंग या विभागांना 70 टक्के, तर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, औषध उद्योग, बीजप्रक्रिया, मत्स्यपालन या विभागांना 50 टक्के या प्रमाणात गॅस पुरवठा करण्याचं नियोजन करण्यात आलं असल्याचं सामंत यांनी सांगितलं.
गॅस सिलिंडर नोंदणी झाल्यानंतर 2-3 दिवसांत पोहोचविण्यात येतील, त्यामुळे नागरिकांनी गॅस एजन्सींच्या दुकानात अनावश्यक गर्दी करू नये, अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन नाशिक जिल्हा प्रशासनाच्या वतीनं करण्यात आलं आहे.

**<u>अंगणवाडी</u>**

गॅस सिलिंडर तुटवड्याचा परिणाम राज्यातील अंगणवाडी केंद्रांमध्ये होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन एकात्मिक बाल विकास सेवा आयुक्तालयानं पर्यायी नियोजन सुरू केलं आहे. राज्यात 1 लाख 10 हजारांपेक्षा जास्त अंगणवाडी केंद्रं कार्यरत असून, या केंद्रांमधून दररोज 66 लाखांपेक्षा जास्त बालकांना पोषण आहार दिला जातो. यातील 65 ते 70 टक्के ठिकाणी स्वयंपाकासाठी गॅसचा वापर केला जातो.

**<u>इंट्रो-वन्यप्राणी सतर्कता:</u>**

नागपूर जिल्ह्यातील रामटेक तालुक्यातील पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या परिसरातील देवलापार आणि पिपरिया भगत वाघ-बिबट्यांचा वावर नवीन नाही. या भागात पाळीव प्राण्यांसह माणसांवरही हल्ल्यांच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे नागपूर ग्रामीण पोलीस आणि वन विभागाने गावकऱ्यांच्या सुरक्षेसाठी एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित यंत्रणा सुरू केली आहे. याबाबतचा हा वृत्तांत...

स्क्रिप्ट :

या प्रकल्पांतर्गत अत्याधुनिक कॅमेरे बसवून ‘ध्वनी आधारितआणि ‘प्रत्यक्ष दृष्य आधारित’ तंत्रज्ञानाद्वारे वन्यप्राण्यांचा वावर ओळखला जातो. वाघ किंवा बिबटे परिसरात आल्यास चितळ, सांबर, माकड यासारखे प्राणी आणि मोर विशिष्ट प्रकारचे आवाज काढून संपूर्ण परिसराला सतर्क करतात. ते विशिष्ट आवाज टिपून हे ‘एआय’ तंत्रज्ञान डेटाचे विश्लेषण करुन त्यासंबंधीचे सतर्कतेचे इशारे गावकऱ्यांना तसेच वन विभागाला मोबाईलवर सतर्कतेचा इशारा पाठवते. नुकतेच पिपरिया येथे वाघाच्या हालचालीबाबत असा इशारा मिळाल्याने गावकरी सावध झाले. मागील अडीच-तीन वर्षांत वाघ-बिबट्यांच्या हल्ल्यात 15 जणांचा मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर हा प्रकल्प राबविण्यात आला आहे. सध्या तीन ठिकाणी ही यंत्रणा सुरू असून 15 एप्रिलपर्यंत पेंच परिसरातील 40 संवेदनशील गावांमध्ये ती बसविण्याचे उद्दिष्ट आहे. पुढे नवेगाव-नागझिरा आणि ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातही ही यंत्रणा उभारण्याचा प्रस्ताव आहे. आकाशवाणीच्या बातम्यासाठी प्रशांत जाधव पुणे.

**<u>एलिव्हेटेड कॉरिडॉर</u>**

कोल्हापूर जिल्ह्यात कागल इथं राष्ट्रीय महामार्ग 48 वर 6 मार्गिकांच्या उन्नत कॉरिडॉरला मंजुरी मिळाली आहे. 357 कोटी 99 लाख रुपयांच्या या प्रकल्पामुळे वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि कार्यक्षम होणार असून उद्योग आणि मालवाहतुकीला मोठी चालना मिळणार आहे. हा मार्ग दिल्ली, मुंबई, पुणे, बेंगळुरू, चेन्नई या प्रमुख शहरांना जोडणार आहे.

**त्रिनेत्र**

अकोला जिल्हा पोलीस दलाने विकसित केलेल्या त्रिनेत्र प्रकल्पाची प्रतिष्ठित स्कॉच पुरस्कारासाठी निवड झाली आहे. शासन, सार्वजनिक प्रशासन आणि नागरी नवकल्पना या क्षेत्रातला हा सर्वोच्च स्वतंत्र सन्मान समजला जातो. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी या प्रकल्पाचं नेतृत्व केलं. हा प्रकल्पएआय-आधारित प्रिव्हेंटिव्ह पोलिसिंग मॉडेल म्हणून देशात लक्षवेधी ठरला आहे.

**उष्मालाट**

अकोला जिल्ह्यात तापमानाची वाढती तीव्रता लक्षात घेऊन प्राथमिक आरोग्य केंद्रांसह सर्व आरोग्य संस्थांमध्ये पुरेशी औषधे, उपचार साहित्य उपलब्ध ठेवावे. उष्मालाटेपासून बचावासाठी आवश्यक दक्षतेबाबत व्यापक प्रमाणावर जनजागृती करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले आहेत.

**हवामान**

दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांसह वादळ, हलका पाऊस आणि ताशी 30 ते 40 किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची दाट शक्यता आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या**

**-कोळसा वायूकरण आणि आणि कार्बन संकलन प्रक्रियेच्या प्रकल्पाचं तसंच भारतातील सर्वात मोठ्या 10 गिगावॅट एकात्मिक इनगॉट आणि वेफर उत्पादन प्रकल्पाचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन**

**- देशात एलपीजी गॅस आणि इंधनांचा पुरेसा साठा, सिलिंडरची नोंदणी ऑनलाईन पद्धतीनं करावी, वितरकांच्या दुकानांबाहेर रांगा लावू नयेत, सरकारचं आवाहन.**

**- अकोला जिल्हा पोलीस दलाच्या त्रिनेत्र प्रकल्पाची स्कॉच पुरस्कारासाठी निवड आणि**

**- दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांसह वादळ आणि हलक्या पावसाची शक्यता**

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.